Vol 6 Issue 6 Dec 2016 ISSN No :2231-5063

International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

Welcome to GRT

RNI MAHMUL/2011/38595 ISSN No.2231-5063

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

GRT Golden Research Thoughts
ISSN: 2231-5063 Impact Factor : 4.6052(UIF) Volume - 6 | Issue - 6 | December - 2016

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शेती विषयक विचार

प्रा.डॉ. सौ. निलीमा राऊत (कोहळे)
डॉ. पंजाबराव देशमुख कला वाणिज्य (सांयम्)
महाविद्यालय, नागपूर.

**प्रास्ताविक–**

शेती ही राष्ट्रीय संपत्ती आहे. केवळ पोट भरण्याचे साधन नाही तर ते राष्ट्रीय उत्पादनाचे एक मोठे साधन आहे. या साधनाकडे केवळ उपजिविकेचे साधन म्हणून पाहू नये तर ते आर्थिक विकासाचे एक महत्वाचे साधन म्हणून विचार केला पाहीजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपले आर्थिक विचार प्रकट करतांना संपूर्ण समाजाचे भान ठेवले होते. सवर्ण शेतमजुरांची स्थिती अस्पृश्यापेक्षा काही वेगळी होती असे कधी त्यांना वाटले नाही. श्रमीक वर्गास आणि लहान शेतक–यास न्याय मिळावा म्हणून त्यांनी वेळोवेळी आपले विचार प्रकट केले. भारतीय अर्थव्यवस्था सुदृढ कशी करता येईल व पर्यायाने संपूर्ण देश समृध्द कसा होईल याकरीता अंत्यत मौलीक असे आर्थिक विचार मांडलेत. भूमीहीन मंजूर लहान जमिनी, खोती पध्दती, महार वतन, सावकारी विधेयक शेती सुधारणा, सामूदायीक शेती, जमिन महसूल, जमीनदारीचे उच्चाटन आणि औद्योगिकरण या विषयावर वेगवेगळया प्रसंगी विचार व्यक्त केले.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि जमिनधारणा :–**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते भारतीय शेतजमिन धारणेचा प्रश्न दोन प्रकारचा आहे.

1. जमिनीच्या मालकी बाबत. 2. जमिनीच्या आकारणीसबंधी आहे.

अशा प्रकारच्या जमिनधारणा पध्दतीमूळे भारतात जातिव्यवस्था व वर्गव्यवस्था अधिकच काटेकोर होण्यांस मदत झाली. या जमिनधारणा पध्दतीमूळे समाजातील दलित व भूमिहीन वर्गाचे जमिनदाराकडून मोठया प्रमाणात सामाजिक व आर्थिक शोषण होत आहे आहे.



भारतीय जमीनधारणा पध्दतीचा दुसरा दोष असा की सरासरी जमीनधारणेचे प्रमाण कमी असल्याने बहूतेक जमीन धारकांना त्या जमिनी मधून कुटुंबाची गरज भागविण्याइतपत ही पुरेसे उत्पन्न मिळू शकत नाही. [1]

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जमिनधारणा विषयी अमुल्य उपाय:**

1. भारतात वारसा हक्कामूळे शेतजमिनीचे तुकडीकरण झाल्यामूळे शेतीची उत्पादकता कमी झाली आहे. त्यासाठी तुकडे बंदी करणे.
2. जमिनीच्या तुकडयांच्या विक्रीवर बंदी घालणे.
3. कर्जापायी शेती विकावी लागत असेल तर ती जमिन शेजारच्या जमीनधारकांस घेण्यांस परवानगी देणे.
4. परंतू त्या बरोबर जमीन एकत्रीकरणाच्या या पध्दतीमूळे मोठे शेतकरी लहान शेतक–यांना भूमिहीन करू शकतील. हा धोका त्यांनी ओळखला होता.
5. जमिनीच्या तुकडे जोडीची पध्दती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मान्य होती.

जमिनीच्या लहान तुकडयाचे सक्तीने एकत्रीकरण करावे नंतर त्या जमिनीचे आर्थिक दृष्टया किफायतशीर तुकडे करून ते त्या जमीनधारकामध्ये वितरीत करावे. त्यामूळे जमिनीचे तुकडे एकत्रित करता येतील व त्यांच्या जमिनीचा आकार आर्थिक दृष्टया किफायतशीर होण्यास मदत होईल.[2]

भारतीय लहान धारण क्षेत्रे आणि त्यावरील उपाय :

लहान धारणक्षेत्रे ही भारतीय शेतील भेडसावणारी एक गंभीर समस्या आहेत, ही लहान धारणक्षेत्रे विखुरलेली असल्याने समस्या अधिक बिकट होते. मुळातच लहान लहान धारणक्षेत्रे व त्यात त्यांचे विखंडन यामुळे साधन संपत्तीचा कार्यक्षमपणे उपयोग करण्यांत अडचण निर्माण होवून उत्पादन खर्च वाढतो व परिणामतः उत्पादकता कमी होते. शेती हा सर्वात मोठा राष्ट्रीय व्यवसाय असल्यामूळे एकीकडे त्यावर सर्वाधिक लोक अवलंबून तर दुसरीकडे शेतीची उत्पादकता कमी यामुळे स्वाभाविकपणे धारणक्षेत्राचा आकार वाढविणे व तुकडे जोड करणे हेच आपल्याला प्राथमिक उपाय वाटतात.

धारणक्षेत्राच्या आकाराविषयीचे डॉ. आंबेडकराचे विचार तपासून पाहणे अगत्याचे ठरेल.

अ. धारणक्षेत्राच्या विखंडनामूळे साधनसंपत्तीचा उपयोग कार्यक्षमपणे करण्यांत अडचण निर्माण होत असतांनाही असे विखंडन मुळातच कां होते?

ब. मोठी धारणक्षेत्रे कार्यदक्ष व लहान धारणक्षेत्र अकार्यदक्ष ही खरोखरच वस्तुस्थिती आहे. काय? दुस–या शब्दात सांगावयाचे म्हणजे किफायतशीर धारणक्षेत्र कसे करवायचे?

क. भारतातील लहान व विखुरलेल्या धारणक्षेत्रामूळे निर्माण झालेल्या समस्येवर अंतिम उपाय कोणता?

धारणाक्षेत्राचे आकारमान मोठे करने हा भारतातील शेती समस्येवर उपाय नसून भांडवल व तत्सम साधनसामुग्रीची उपलब्धता वाढविणे हा खरा उपाय आहे.[3]

**शेती समस्यावर डॉ. आंबेडकरांनी सांगितलेले उपाय :**

डॉ. आंबेडकरानी शेती हा 'राष्ट्रीय व्यवसाय', मानला आहे यावर निर्माण होणा–या समस्यावर त्यांनी आपले अमुल्य विचार मांडले आहे.

**1. 'शेतीचे औद्योगिकरण'–** डॉ. आंबेडकराच्या मते 'भारतातील शेतीचा प्रश्न सोडविण्यास शेतीचे औद्योगिकरण' हा एकच खात्रीलायक उपाय आहे.

**फायदे :–**

अ.यामुळे शेतीक्षेत्रातील अनावश्यक व बेकार श्रमउत्पादक अशा बिगर शेतीक्षेत्रात समावून घेतले गेल्यामूळे अशा श्रमांना

यापुढे दुस—याच्या श्रमावर उपजीविका करण्याचे कारण उरणार नाहीच.
ब. यापुढे ते स्वतःच्या प्रतिपाळासाठी उत्पादन करून राष्ट्राच्या अतिरिक्त उत्पन्नात भर घालण्याचे काम करतील.
क. जमिनीपासून मिळणारा तथाकथीत फायदा संपुष्टात येवून जमिनीवरील भार कमी होईल.
ड. परिणामतः जमिनीचे विभाजन व विखंडन करण्याच्या प्रवृत्तीस आळा बसेल.

शेवटी जमिनीवरील लोकसंख्येचा भार कमी झाला व भांडवल आणि तत्सम साधनाचा मशागतीमध्ये वाढता वापर होवू लागला तर मोठी धारणक्षेत्रे निर्माण करण्याची आपोआपच गरज निर्माण होईल व धारण क्षेत्रे मोठे करावीच लागतील.

अशा त—हेने डॉ. आंबेडकराच्या मते, भारतातील शेतीचे प्रश्न सोडविण्याचा औद्योगिकरण हा एक खात्रीलायक उपाय होय.[4]

***2.सहकारी शेती*** —भारतातील शेतीची समस्या सोडविण्याचा एक मार्ग म्हणून डॉ. आंबेडकरानी सहकारी शेतीचाही पुरस्कार केला आहे.
डॉ. आंबेडकर म्हणतात, ''एका विशिष्ट आकाराची सहकारी शेती अस्तित्वात आणल्यास आपल्या छोटया शेतक—यांना त्यांच्या विनाशापासून वाचविता येईल.''
अ. सहकारी शेतीमूळे शेतक—यांच्या जमिनीवरील मालकी हक्क अबाधीत राहील.
ब. त्यांच्या लागून असलेल्या धारणक्षेत्राला जोडल्याशिवाय त्याला आपले धारणक्षेत्र कसण्याची मूभा असणार नाही.
क. अशा तरतुदीमूळे (सहकारी शेतीचे) लागवडीखालील एकुण जमिन प्रमाणीत आकारमानाइतकी किंवा त्याहूनही जास्त होईल.
थोडक्यात, सहकारी शेत जसे मोठया आकारमानाचे असेल तसेच ते एकसंघही असेल.[5]

### *भूमिहीन मजुरांचा प्रश्न :*

भमिहीन मजुरांचा प्रश्न शेतीच्या नविन पध्दतीने सोडविणे शक्य होते. आणि शेतीचे औद्योगिकरण केल्याशिवाय भूमिहीन मजूरांचा प्रश्न मुलतः सुटणार नाही असे डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे मत होते. शेतीपासून उद्योग धंद्याची फारकत होणे हे अर्थव्यवस्थेला धोकादायक असते पण शेती बरोबर शेतमालावर प्रकिया करणारे उद्योग वाढविले तरच शेतक—यांचा प्रश्न सुटेल. औद्योगिकरण, विशेषतः ग्रामीण भागातील आद्योगिकरण त्याचप्रमाणे सुधारीत शेती यांचा उपयोग देशातील कामगारांना काम देण्यांत होईल असे त्यांना वाटत होते. प्राप्तीकर कायद्याच्या तरतुदीप्रमाणे जमीन महसुलाची वसुली व्हावी जमीनदार शाही व महार वतने रद्द करण्यावर भर दिला होता. त्याला ते आर्थिक लढा किंवा पिळणा—या विरूध्द पिळल्या जाणा—या वर्गाचा लढा असे म्हणत.

### *पंजाबात जमिनीची मालकी —*

पंजाबात दलितांना जमीन विकत घेण्याचा अधिकारच नव्हता. समान संपत्तीचा अधिकार मिळाल्यावर घटना परिषदेचे सदस्य श्री यशवंत राय बाबासाहेबांची स्तुती करीत म्हणतात, '' पंजाबातील दलित लोक मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. आंबेडकर हयांचे अतिशय ऋणी आहेत कारण त्यांनी घटनेत अनुच्छेद 13 अंकित केले ज्यामूळे दलित हरिजंनाना शेतीसाठी, घरासाठी जमीन विकत घेण्याचा अधिकार प्राप्त झाला. डॉ. आंबेडकराचे हे कार्य आर्थिक दृष्टया ऐतिहासीक मोलाचे होय.?[6]

### *डॉ. आंबेडकर आणि गरीब जनतेचे शोषण करणा—या पध्दती :*

डॉ. आंबेडकर हे अत्युच्च दर्जाचे अर्थतज्ञ होते केवळ पुस्तकी अर्थतज्ञ नव्हते तर अर्थशास्त्रातील व्यावसायीक कौशल्याची गरीब व पददलित जनतेच्या आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी करावयाच्या जनतेच्या लढयातील नेतृत्वाशी सांगड घालणारे ते एकमेव नेते होते.

भारताच्या विकासाकरीता गरीब ग्रामीण जनतेचे शोषण करणा—या खोती पध्दती, महार वतन, सावकारी नियंत्रण कायदा या गरीब जनतेच्या जिव्हाळयाच्या प्रश्नावर त्यांनी लक्षणीय कागमिरी केली. 1926 मध्ये विधिमंडळाचे सदस्य म्हणून विधिमंडळात चर्चेत भाग घेवून आणि विधिमंडळात जनतेचे लढे उभारून गरीब ग्रामीण जनतेच्या गा—हाण्यांना त्यांनी वाचा फोडली.

***1. खोती पध्दती :—***

खोती एक जमिनदारीचाच प्रकार आहे. यात खोताच्या खोती अधिकाराखालील जमिनी शेतकरी कसत व बदल्यात खोताना जमीन महसुल देत. खोती पध्दतीखाली येणा—या शेतक—यांना व त्यांच्या कुंटुबियाना खोताकडून पिढयान—पिढया वेठबिगारीची वागणूक मिळे ही पिळवणुकीची पध्दत बरेच वर्षे त्या भागात रूढ होती.

### *खोती पध्दती विरूध्द डॉ. बाबासाहेब आंबेडकराचा लढा :—*

भारताच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने ग्रामीण जनतेचे शोषण करणा—या खोती पध्दती महार वतन आणि सावकारी नियंत्रण कायदा या गरीब जनतेच्या जिव्हाळयाच्या प्रश्नावर डॉ. आंबेडकरानी लक्षणीय कामगिरी केली 17 सप्टेबर 1937रोजी खोती पध्दत नष्ट करण्याच्या सबंधीचे आपले ऐतिहासीक विधेयक मुंबई विधीमंडळात सादर केले.[7] कुळ म्हणून जमिनी कसणा—या शेतक—यांची गुलामगिरी नष्ट व्हावी म्हणून विधेयक मांडणारे आणि त्याचबरोबर सामाजिक चळवळ उभारून खोती पध्दतीवर दुहेरी हल्ला चढविणारे डॉ. आंबेडकर हे भारतातील पहिलेच लोक प्रतिनिधी होते. त्यांचे हे कार्य भारताच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने अंत्यत मोलाचे आहे. शेवटी 1939 साली खोती पध्दत कायद्याने नष्ट करण्यांत आली.[8]

### *''महार वतना''सबंधी विधेयक :—*

19 मार्च 1928 रोजी महार वतनासबंधीचे विधेयक मुबंईच्या प्रांतिक विधिमंडळाात मांडले त्यावर चर्चा करतांना डॉ. आंबेडकरांनी सभागृहाच्या लक्षात आणून दिले की, ''जमिनीवरील काम वाढले, महागाई वाढली पण शेतमजूरांची मजूरी वाढली नाही'' डॉ. आंबेडकर म्हणतात की ''महार वतनही एक निर्घृण पध्दती आहे. तिच्यात कुठल्याही प्रकारचा न्याय नाही. यात काम करणा—या शेतमजूरांनी वेतनाची जबाबदारी सरकारने आपल्या खांद्यावर घेतली पाहीजे. शासन जर शिक्षक व तलाठी यांच्या सारख्या इतर कर्मचा—याच्या वेतनाकरीता आर्थिक उपाययोजना करीत असेल तर तेच धैर्य, मनोनिग्रह आणि तिच सहानुभूती शासन महारांच्या बाबतीत कां दाखवित नाही.[9]

डॉ. आंबेडकरानी मांडलेले विधेयक विधिमंडळाच्या 23 सभासदांच्या चिकित्सा समितीकडे सोपविले गेले त्यात आमुलाग्र बदल होवून त्याचा तोंडवळा पूर्णपणे बदलला आणि हताश झालेल्या डॉ. आंबेडकरानी 24 जुलै, 1929 रोजी हे विधयक मागे घेतले. पण डॉ. आंबेडकरांचे अथक परिश्रम वाया गेले नाहीत. डॉ. आंबेडकराचे 1956 साली महापरिनिर्वाण झाल्यानंतर 1959 च्या ''कनिष्ठ गाववतन निर्मूलन'' अधिनियमाद्वारे शेवटी महार वतने नष्ट करण्यांत आली.[10] त्या अधिनियमामूळे आर्थिक सामाजिक प्रगतीला अडसर असलेली वतनदारी पध्दतीतून वाट मोकळी झाली. गरीब शेतक—यांची

गुलामगिरी नष्ट झाली ही ग्रामीण शेतक—यांच्या विकासासाठी डॉ. आंबेडकरांची मोलाची देणगीच म्हणावी लागेल.

सावकाराकडून गरीब, दलित पीडीत शेतक—यांच्या होणा—या पिळवणुकीची स्पष्ट संकल्पना डॉ. आंबेडकराना होती. सावकारांच्या या गैरकृत्यांना आळा घालण्यासाठी मुबंई सावकारी विधेयक सन 1938 मध्ये तयार केले त्यात सावकाराला दरवर्षी नुतनीकरणाची आवश्यकता कर्जाऊ दिलेल्या पैशाची सक्तीची लेखी नोद ठेवणे धनको—ऋणको यांची खाती पुस्तीका ठेवणे या तरतुदी अगदी आजच्या काळातही अभिनव वाटाव्यात इतक्या प्रगत स्वरूपाच्या होत्या.[11]

## सारांश —

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशातील ग्रामीण जनतेच्या वास्तविक परीस्थितीची चिकीत्सा करून या देशातील आर्थिक विषमतेला कारणीभूत असलेल्या व्यवस्थेची चिरफाड करून गरीब, दलित, पिडीत, ग्रामीण शेतक—यांच्या विकासाच्या दृष्टीने अंत्यत मौलिक असे आर्थिक विचार त्यांनी मांडलेत. या अमोल विचारात देशापुढील आर्थिक व सामाजिक विषमतेच्या समस्यांची जाणीव देशाला करून दिली आहे.

समाजाला टिकविण्यासाठी आवश्यक असलेले निकष त्यांच्या बाधीलकीने समाजाला आणि पर्यायाने चळवळी सुध्दा जगवून स्वतःला जगविण्याचे तत्व जनतेला दिले. देशातील नवसमाज निर्मीतीत आर्थिक विषमता नष्ट करण्याच्या मूलभूत विचारसरणीतूनच भारताचे व लोकशाहीचे भवितव्य उज्ज्वल होईल.

## संदर्भ ग्रंथ सूची :—

1. ''डॉ. आंबेडकर रायटींग ऍण्ड स्पीचेस' महाराष्ट्र सरकार प्रकाशन, खंड1, पृ. 475
2. म. क. डोंगरे, डॉ. आंबेडकराचे आर्थिक विचार पृ. 67, नागपूर 1974
3. कित्ता पृ. 71
4. डॉ. नरेन्द्र जाधव, डॉ. आंबेडकर आर्थिक विचार आणि तत्वज्ञान पृ. 54, सुगावा प्रकाशन मुबंई, 1993
5. भा. कृ. केळकर,, भारतभूषण डॉ. आंबेडकर, पृ. 74, सुगावा प्रकाशन पुणे (1994) 'डॉ. आंबेडकर रायटिंग ऍन्ड स्पीचेस' महाराष्ट्र सरकार, खंड 2, पृ. 457
6. ए. आर. बाली, डॉ. आंबेडकर जीवन और मिशन' पृ. 12, सुगत प्रकाशन नागपूर. 1996
7. प्रा. रमाकांत यादव, खोती आंदोलन, पृ. 38, (डॉ. आंबेडकर कणकवळी परिषद, सुवर्ण महोत्सव, विशेषांक स्मरणिका.
8. डॉ. मधुकर कसारे, 'डॉ. आंबेडकरांचे आर्थिक चिंतन' पृ. 81, नागपूर विद्यापीठ प्रकाशन 1991
9. कित्ता पृ. 82
10. डॉ. नरेन्द्र जाधव पूर्वोक्त पृ. 52
11. भ. क. डोंगरे पूर्वोक्त 42

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org